# विशेष शाखा मिरा-भाईंदर,वसई- विरार पोलीस आयुक्तालय

## विशेष शाखा

टेबल क्रः- १२ | पेपर कात्रण | दिनांक :- ०९/११/२०२४

-----------------oooooo------------------

विशेष शाखा मिरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय

१) मा. पोलीस उप आयुक्त ( मुख्यालय) यांचा शेरा:-

२) मा. अपर पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

३) मा. पोलीस आयुक्त यांचा शेरा:-

Scanned with OKEN Scanner

# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक ०९/११/२०२४ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०९/११/२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | गावठी दारू अड्ड्यावर वसईत पोलिसांचे छापे | गुन्हे कक्ष २ | |
| २. | ०९/११/२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | त्या ४ वर्षीय चिमुरडीची मृत्युशी झुंज संपली | नवघर | |
| ३. | ०९/११/२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | बाळासाहेबांना ठेवले स्थानिक नेत्यांच्या पंक्तीत | मिरा -भाईंदर | |
| ४. | ०९/११/२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | तरूणीचा विनयभंग | नवघर | |
| ५. | ०९/११/२०२४ | लोकमत पु. पान क्र. १ | समस्यांचे माहेरघर नालासोपारा शहर | नालासोपारा | |
| ६. | ०९/११/२०२४ | पुढारी पान क्र. ३ | वसईत सलग दुसऱ्या दिवशी २ कोटींहून अधिक रक्कम जप्त | वसई,विरार नालासोपारा | |
| ७. | ०९/११/२०२४ | नवाकाळ पान क्र. ५ | मविआ उमेदवाराची बदनामी मिरारोडमध्ये ५ जणांवर गुन्हे दाखल | मिरारोड | |
| ८. | ०९/११/२०२४ | पुण्यनगरी पु. पान क्र. ७ | मिरा-भाईंदर पोलिसांकडून ऑल आऊट, कोंबिंग ऑपरेशन | मिरा -भाईंदर | |
| ९. | ०९/११/२०२४ | पुण्यनगरी पु. पान क्र. ७ | विरारच्या एटीएममधील अलार्मने उडवली नागरिकांची झोप | विरार | |
| १०. | ०९/११/२०२४ | लोकसत्ता पान क्र. १२ | वसईत अनेकांना अर्ज मिळाले नसल्याच्या तक्रारी | वसई-विरार | |
| ११. | ०९/११/२०२४ | लोकसत्ता पान क्र. १३ | मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम | वसई-विरार | |
| १२. | ०९/११/२०२४ | लोकसत्ता पान क्र. १३ | खासदार मनोज तिवारी यांचा रोड शो | वसई-विरार | |
| १३. | ०९/११/२०२४ | लोकसत्ता पान क्र. १३ | टर्मिनस उभारण्याचे सर्वपक्षीय आश्वासन | मिरा -भाईंदर | |
| १४. | ०९/११/२०२४ | नवभारत पु. पान क्र. ३ | एटीएम वैन से ब्लैक मनी की सप्लाई, ७.८० करोड रू. जप्त | मिभाववि | |
| १५. | ०९/११/२०२४ | दैनिक भास्कर पान क्र. ३ | बंद गाडी मे मिला शव, दुर्गंध से पता चला | बोळींज | |
| १६. | ०९/११/२०२४ | Mid-day | 2,85,932 litres of illegal liquor seized in Thane alone | Bolinj | |
| १७. | ०९/११/२०२४ | The times of india | 21-yr-old dies while removing Diwali lantern | Bolinj | |
| १८. | ०९/११/२०२४ | The free press journal | The Big lelection seizures | MBVV | |
| १९. | ०९/११/२०२४ | The free press journal | Raids, seizures and patrols ahead of polls | MBVV | |

लोकमत पु. पान क्र. 1



वसई पूर्वेकडील कर्नाळापाडा खाडीलगत तिवराच्या झाडीमध्ये गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा मारून दारुच्या अड्ड्यांवर कारवाई केली.

# गावठी दारू अड्ड्यांवर वसईत पोलिसांचे छापे

## कारवाईत लाखोंचा मुद्देमाल नष्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गावठी हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या पोलिसांनी छापा टाकून लाखोंचा मुद्देमाल नष्ट केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी, सपोनि. शिवकुमार गायकवाड यांनी शुक्रवारी दिली आहे.

वसई पूर्वेकडील कर्नाळापाडा खाडीलगत तिवराच्या झाडीमध्ये अज्ञात व्यक्ती अवैधरीत्या दारूच्या भट्ट्या लावत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या पोलिसांना मिळाली. त्या अनुषंगाने कडक कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले. त्यानुसार गुरुवारी सकाळी गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी, अंमलदार यांनी पोहचून कर्नाळापाडा खाडीलगत तिवराच्या झाडी परिसरात छापा घातला.

### या पोलिसांनी पार पाडली कामगिरी

या अड्ड्यावर छापा टाकण्याची कामगिरी पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे, पोउपनिरी. अजित गिते, पोलिस हवालदार जगदीश गोवारी, रमेश आलदर, अमोल कोरे, राजकुमार गायकवाड यांनी पार पाडली आहे.

- **पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये १ लाख ६४ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल सापडला. त्यात ४ हजार लिटर नवसागर गूळ मिश्रीत वॉश, २० लिटर गावठी हातभट्टीची दारू व दारू तयार करण्याचे साहित्य जप्त करण्यात आले.**

# 'त्या' ४ वर्षीय चिमुरडीची मृत्यूशी झुंज संपली

## सेल्फी पॉइंटला शॉक : झाली होती जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क



मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेच्या भाईंदर (पूर्व) येथील एका सेल्फी पॉईंटच्या उघड्या विद्युत वायरला स्पर्श झाल्याने ३० ऑक्टोबर रोजी ४ वर्षांच्या चिमुरडीला शॉक लागून ती गंभीर जखमी झाली होती. गेले आठवडाभर मृत्यूशी झुंज देणाऱ्या चिमुरडीचा अखेर मृत्यू झाला आहे.

भाईंदर पूर्वेच्या गोडदेव-फाटक मार्गावरील गॅस गोडाऊन गल्ली येथील रिद्धी-सिद्धी इमारतीत राहणारे सलमान मुकेरी हे ३० ऑक्टोबरच्या रात्री चार वर्षांची मुलगी मेहशरजहां आणि मुलगा फैजान यांना दुचाकी वरून फेरफटका मारण्यास निघाले होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, आझाद नगर, गोल्डन नेस्ट सर्कल येथील महापालिकेच्या तत्कालीन नगरसेविका स्नेहा शैलेश पांडे यांच्या नगरसेविका निधीतून झालेल्या सेल्फी पॉईंटजवळ खेळताना ती स्टील रेलिंगला चिकटल्याचे व तिचे शरीर झटके खात असल्याचे दिसून आले. वडिलांनी पहिले असता सेल्फी पॉईंटमधील विद्युत केबलची चिकटपट्टी निघून उघडी असल्याचे आणि त्यावर मुलीच्या पायाचा अंगठा चिकटला असल्याचे दिसताच त्यांनी तिला तत्काळ खेचून बाजूला केले.



### ठेकेदारावर केला होता गुन्हा दाखल

- मेहशरजहां हिची शुद्ध हरपली असल्याने तिला तत्काळ मीरा रोडच्या खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. तिला वाचवण्याचा प्रयत्न डॉक्टर करत होते, परंतु गुरुवारी रात्री तिने उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला.
- **१ नोव्हेंबरच्या मध्यरात्री नवघर पोलिसांनी केवळ विद्युत ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे वीजवाहक केबलला टेप न लावता ती उघडी असल्याने मुलीला शॉक लागून तिला गंभीर दुखापत झाली म्हणून अनोळखी ठेकेदारावर गुन्हा दाखल केला होता.**
- त्यात पालिकेच्या जबाबदार अधिकाऱ्यास आरोपी न केल्याने पोलिसांवर संशय व्यक्त होऊ लागला. आता तर मुलीचा मृत्यू झाल्याने पोलिस गुन्ह्याची कलमे वाढवण्यासह पालिका अधिकाऱ्यांना आरोपी करून अटक करणार का? असा सवाल करण्यात येत आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पान क्र. १

# बाळासाहेबांना ठेवले स्थानिक नेत्यांच्या पंक्तीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांनी त्यांच्या प्रचारार्थ लावलेल्या होर्डिंगमध्ये दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा अपमान केला आहे. बाळासाहेबांसह आनंद दिघे यांची छायाचित्रे ही स्थानिक नेत्यांच्या पंक्तीत लहान आकारात टाकणे संतापजनक असून, त्यांना मानणारे लोक गप्प बसणार नाहीत, असा इशारा मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी दिला आहे.

मीरा-भाईंदर मतदारसंघातून मराठी आमदार हवा, अशी भूमिका मराठी एकीकरण समितीने घेतली आहे. शहरात मराठी माणसांवर अन्याय होत असून त्यांना घरे दिली जात नाहीत. शहरातल्या राजकारणातही मराठी माणसांचे खच्चीकरण केले जात आहे. त्यामुळे यंदा मराठी आमदार हवा, असे मराठी एकीकरण समितीने आवाहन केले आहे.

बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे छायाचित्र हे सन्मानाने मोठे असायला हवे होते; परंतु स्थानिक नेत्यांच्या पंक्तीत त्यांची छायाचित्रे टाकून लाखो लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. शिवसैनिक हे सहन करणार का? असा प्रश्नही देशमुख यांनी केला आहे.

# तरुणीचा विनयभंग



**मीरा रोड :** कार्यालयात काम करणाऱ्या तरुणीला कामाच्या बहाण्याने गाळ्यात नेऊन तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कंपनीच्या ६० वर्षीय व्यवस्थापकाविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्गावरील टेम्पो गल्लीत अभिषेक सेल्स कॉर्पोरेशन नावाने व्यवसाय चालतो. त्या ठिकाणी नोकरी करणाऱ्या एका २० वर्षीय तरुणीला कंपनीचा व्यवस्थापक जसवंत नमिनदास शाह (६०) याने बॉक्स शोधायच्या बाहण्याने कार्यालयातील वरच्या गाळ्यात नेले. तिकडे त्याने तिच्याशी विनयभंग करत जबरदस्ती कपडे काढण्याचे प्रयत्न केले. तसेच याबद्दल कोणाला सांगितल्यास तुला जीवे ठार मारेन, अशी धमकी दिली. तरुणीच्या फिर्यादीनंतर नवघर पोलिसांनी जसवंत शाह विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पालवे हे तपास करत आहेत.

लोकमत पु. पान क्र. ३

# समस्यांचे माहेरघर नालासोपारा शहर

## यंदा १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**नालासोपारा**

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अनधिकृत बांधकामे, रस्त्यावरील खड्डे, रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग, वाहतूक कोंडी, फेरीवाल्यांचा विळखा अशा अनेक समस्यांचे माहेरघर म्हणजे नालासोपारा शहर. नालासोपारातून यावेळी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात बविआचे क्षितिज ठाकूर, महायुतीचे राजन नाईक, मविआचे संदीप पांडे, प्रहार जनशक्तीचे धनंजय गावडे, मनसे विनोद मोरे, वंचित आघाडीचे सूचित गायकवाड, बहुजन समाज पार्टी सुरेश मोने, अपक्ष म्हणून बलराम ठाकूर, हरेश भगत, कीर्तिराज लोखंडे, विनोद पाटील, नरसिंग आदावले हे निवडणूक लढवीत आहेत. पण, मुख्य लढत क्षितिज ठाकूर आणि राजन नाईक यांच्यातच होणार आहे.

वसई-विरार शहराचे क्षेत्रफळ ३८० चौ.किमी असून, लोकसंख्या २५ लाखांच्या घरात आहे. रस्ते अरुंद असून, वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या कोंडीचा वाहनचालक, सामान्य नागरिकांना त्रास होत आहे. सर्वाधिक वाहतूक कोंडी ही शहराच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे जाण्यासाठी होत असते.

### रिंगणातील प्रमुख उमेदवार



क्षितिज ठाकूर (बविआ)



राजन नाईक (भाजप)

### २०१९ मधील मते

| | |
|---|---|
| क्षितिज ठाकूर (बविआ) | १,४९,८६८ |
| प्रदीप शर्मा (शिवसेना) | १,०६,१३९ |


### मतदारसंख्या

६,०८,५२६ एकूण मतदार

३,२६,५२२ पुरुष मतदार

२,८१,८८४ महिला मतदार

१२० तृतीयपंथी



### लोकसभेला काय चित्र

लोकसभा निवडणुकीत भाजपच्या डॉ. हेमंत सवरा यांना नालासोपारा विधानसभा मतदारसंघात १,३६,८९८ मते मिळाली होती. बविआच्या राजेश पाटील यांना ७९,४६० मते मिळाली होती, तर उद्धवसेनेच्या भारती कामडी यांना ६६,९५० मते मिळाली होती.

### मतदारसंघातील समस्या

- नालासोपाऱ्याच्या बहुतेक भागात उघडे नाले व गटारांची झाकणे उघडी असणे ही मोठी समस्या आहे. सुरुवातीला पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून औषधाची फवारणी केली जात होती, तर डास नियंत्रणात आणण्यासाठी व उत्पत्ती रोखण्यासाठी कीटक निर्मूलन पद्धतीचाही वापर केला आहे.
- डासांची समस्या काही केल्या नियंत्रणात येत नसल्याचे दिसून आले आहे. यासाठी शहरातील उघडी गटारे, नाले असलेल्या परिसरात दररोज औषध फवारणी होणे आवश्यक आहे.

CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. ३

# वसईत सलग दुसऱ्या दिवशी २ कोटींहून अधिक रक्कम जप्त

## वसईच्या भाजी मार्केटमध्ये बँकेच्या एटीएम व्हॅनमध्ये आढळली रोकड

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर नाक्यानाक्यावर पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. गुरुवारी वसईत साडेतीन कोटींची रोकड जप्त केल्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी शुक्रवारी दोन कोटी तीस लाख रुपयांची रोकड वसई-विरार पालिकेच्या भरारी पथकाने जप्त केली आहे. गुरूवारी नालासोपारा, मांडवी आणि मिरा रोड मध्ये ७ कोटी ८० लाखांची रोकड जप्त करण्यात आली होती. बँकेच्या एटीएम व्हॅन मधून या बेहिशोबी पैसे नेण्यात येत होते.

एका बँकेच्या एटीएम व्हॅनमधून बेहिशोबी पैसे नेले जात असल्याची माहिती वसई विरार महापालिकेच्या भरारी पथकाला माहिती मिळाली होती. शुक्रवारी सकाळी ११ च्या सुमारास विरार पश्चिमेच्या भाजी मार्केट परिसरात सापळा लावून बँकेच्या एटीएम व्हॅन ताब्यात घेतली. या व्हॅनमध्ये २ कोटींहून अधिक रुपयांची रोकड आढळली आहे.

सध्या मोजणी सुरू आहे अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी दिली. या रकमेचा कुठलाही अधिकृत कागदपत्रे संबंधितांकडे नव्हती. ही रोकड जप्त करण्यात आली असून आयकर विभागाला पुढील कारवाईसाठी प्रकरण सोपविण्यात आले आहे. भरारी पथकाचे प्रमुख बेंजामिन डाबरे, नरेंद्र संख्ये, पोलीस कर्मचारी अनिल सोनावणे आदींच्या पथकाने ही कारवाई केली. गुरूवारी देखील नालासोपाऱ्यात साडेतीन कोटी, विरारच्या मांडवी येथे २ कोटी ८० लाख रुपये आढळले आणि मिरा रोड मध्ये १ कोटी ४७ लाख रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली. विशेष म्हणजे हे सर्व बेहिशोबी रक्कम बँकांच्या एटीएम व्हॅनमधूनच जप्त करण्यात आल्या आहेत.



**ठिकठिकाणी पोलिसांचे धाडीसत्र**

वसई, विरार आणि नया नगरमध्ये पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे घालून एटीएम व्हॅनमधून तब्बल ७ कोटी ८० लाखांची रोकड जप्त केली आहे. कुठल्याही कागदपत्रांशिवाय ही रोकड बाळगण्यात आली होती. निवडणुकीनिमित्त बेकायदेशीररित्या काळ्या पैशांची देवाण घेवाण होत असते. त्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने रोकड बाळगवण्यावर कडक निर्बंध आणले आहे. तशा सुचना पोलीस आणि भरारी पथकाला.देण्यात आल्या आहेत. बँकांच्या एटीएम केंद्रामध्ये खासगी कंपनीमार्फत रोकड भरण्यात येत असते. मात्र या व्हॅनमधून बेकायदेशीररित्य रोकड नेली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसारा नालासोपारा, मांडवी आणि नया नगर येथे वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांनी छापे मारले. यात एकूण ७ कोटी ८० लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली.

नवाकाळ पान क्र. 5

# मविआ उमेदवाराची बदनामी मिरारोडमध्ये ५ जणांवर गुन्हे दाखल

■ मिरारोड

मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसैन यांची समाजमाध्यमावर बदनामी केल्याबद्दल पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

मुझफ्फर हुसैन यांची बदनामी करणाऱ्या पोस्ट या लोकांनी समाजमाध्यमावर प्रसारित केल्या होत्या. त्या प्रकरणी त्यांच्यावर मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. मुझफ्फर मीरारोडमध्ये प्रचार करत असताना एका व्हॉट्सअॅप ग्रुपवर त्यांची बदनामी करणारा मजकूर फिरत असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. यामध्ये त्यांना दहशतवादी दाखवण्यात आले. मुझफ्फर हे जातीय तेढ निर्माण करत असल्याचा आरोपही त्यांच्यावर केला गेला. काही जणांनी त्यांच्या नावाने एका बनावट पिटीशनही तयार केली. या प्रकरणात उमेदवारांनी मीरा रोड पोलीस स्थानकात तक्रार केली असता पोलिसांनी गुन्हे दाखल केले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी - पु. पान क्र. 7

# मीरा-भाईंदर पोलिसांकडून ऑल आऊट, कोंबिंग ऑपरेशन

**। मीरा रोडः** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबरपासून आचार संहिता लागू करण्यात आली असून त्या अनुषंगाने मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ १ अधिनस्त काशिमीरा, काशिगांव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन पोलीस ठाणे हद्दीत ऑल आऊट, कोंबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवण्यात आली होती.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस मधुकर पाण्डेय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, व परिमंडळ-१ अधिनस्त विभागीय ३ सहाय्यक पोलीस आयुक्त, १२ पोलीस निरीक्षक , सहा. पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक ३२ व पोलीस अंमलदार १३० यांनी या कारवाईत सहभाग घेतला. ऑल आउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान १० जणावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली, ७ जणावर दारुबंदी कायदान्वये कारवाई करण्यात आली. या कारवाई मध्ये एकूण ११,५९,९४५ रुपये किमंतीची दारु व मुद्देमाल जप्त करण्यात आला.१६ हिस्ट्रीशिटर तपासले, ३१ हॉटेल व लॉजेस तपासले, ८ तडीपार तपासले, एनडीपीएस कायदयान्वये अंमली पदार्थाचे सेवन केल्याबाबत ८ जणांवर केसेस करण्यात आल्या. कोप्ता अंतर्गत ७ एन.सी. दाखल केल्या, ७ पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. नाकाबंदीच्या वेळी मोटार वाहन कायदया अन्वये ४७ केसेस करण्यात आल्या आहेत. तसेच गुरुवारी नयानगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये बॅक रोड परिसरामध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने नयानगर पोलीस ठाणे येथील अधिकारी अंमलदार संशयित वाहनाची तपासणी करत असतानाा वाहनामध्ये १,०९,५०,००० रोख रक्कम मिळून आली. मिळालेल्या रक्कमेबाबत पोलीसांकडून चौकशी सुरु आहे.

# विरारच्या एटीएममधील अलार्मने उडवली नागरिकांची झोप



**। वसई :** वसई- विरार मधील कॅनरा बॅकेच्या एटीएम मधील सुरक्षेसाठी असलेला अलार्म गुरुवारी मध्यरात्री अचानक वाजू लागल्याने साखर झोपेत असलेल्या नागरिकांची झोपच उडून गेली.तब्बल ५ तास हा अलार्म सुरू असल्याने नागरिक संतप्त झाले होते.

विरार-पूर्व फुलपाडा-गांधी चौकात असलेल्या रामचंद्र अपार्टमेंट मध्ये कॅनरा बॅकेचे एटीएम आहे.या एटीएम केंद्राबाहेर सुरक्षा रक्षक नसल्यामुळे धोक्याची सुचना देणारा अलार्म लावण्यात आला होता.गुरुवारी मध्यरात्री ३ च्या सुमारास अचानकपणे हा अलार्म वाजू लागला.त्यामुळे नागरिकांची झोप उडाली.एटीएमवर दरोडा पडल्याची शक्यता असल्यामुळे भयभीत होवून ते घरातच बसून राहिले.पोलीस किंवा बॅकेचे अधिकारी आल्यावर अलार्म बंद होईल आणि नेमके कारण कळेल,अशा आशेत नागरिक पुन्हा झोपेच्या स्वाधीन होण्याचा प्रयत्नात होते.मात्र,तब्बल पाच तास हा अलार्म वाजत राहिला,या दरम्यान,पोलीस किंवा बॅकेचे प्रतिनिधी रामचंद्र अपार्टमेंटकडे फिरकलेच नाही.त्यामुळे स्थानिक नागरिकांनीच पोलिसांना याबाबत वर्दी दिली.

तरीही पोलीसही घटनास्थळी फिरकले नाहीत सतत ५ तास वाजणाऱ्या अलार्ममुळे स्थानिकांना खूप त्रास सहन करावा लागला. असे प्रकार अधून मधून वारंवार होत असतात.त्याच्या आवाजाचा आम्हाला त्रास सहन करावा लागतो असे नागरिकांनी सांगितले.पोलिसांनी मात्र अशा प्रकारच्या घटनेची नोंद नसल्याचे सांगितले.आमच्याकडे बँकेकडून कुठल्याही प्रकारची तक्रार आली नाही,अशी माहिती विरार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवलकर यांनी दिली.ज्या एटीएम केंद्रात सुरक्षा रक्षक नसतो तेथे सुरक्षेसाठी स्वयंचलित अलार्म लावण्यात येतो. एटीएम केंद्रात दोन पेक्षा जास्त ग्राहक शिरले तर सेन्सरमुळे हा अलार्म वाजतो.गुरूवारी इतका वेळ अलार्म का वाजत होता, त्याची माहिती बँकेच्या स्थानिक शाखेकडून घेतली जाईल असे कॅनरा बँकेच्या उत्तर विभागाचे व्यवस्थापक अभिलाष मिश्रा यांनी सांगितले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पान क्र. 12

# वसईत अनेकांना अर्ज मिळाले नसल्याच्या तक्रारी

**वसई :** वसई मतदारसंघात ज्येष्ठ नागरिक आणि अपंग मतदारांना वाटप करण्यात आलेल्या सात हजार अर्जांपैकी केवळ ३७१ जणांनी गृहमतदानास परवानगी दिली आहे. त्यामुळे वाटप करण्यात आलेल्या अर्जांवर संशय व्यक्त होत असून अनेक ज्येष्ठ नागरिकांना अर्जच मिळाले नसल्याच्या तक्रारी आहेत.

८५ वर्षांवरील ज्येष्ठ तसेच अपंग मतदारांना घरी जाऊन मतदान करण्यासाठीच्या अर्जांचे वाटप मतदान केंद्र अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आले होते. त्यानुसार वसई मतदारसंघात सात हजार ७० अर्जांचे वाटप केले. शुक्रवारी स. ८ वाजता अंतिम यादी जाहीर करण्यात आली. त्यात फक्त ३७१ जणांची नावे होती. याबाबत विचारले असता त्यातील अनेकजण मृत झाल्याचे उत्तर वसईच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले. सात हजार अर्जांचे वाटप कुठल्या आधारावर केले, असा आरोप काँग्रेसचे नेते किरण शिंदे यांनी केला आहे. ही यादी बोगस असून अनेक ज्येष्ठांची नावे त्यात नाहीत असे त्यांनी सांगितले. मतदान केंद्र अधिकारी अनेक ज्येष्ठांपर्यंत पोहोचले नाहीत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी अॅड. जिमी घोन्साल्व्हिस यांनी केली. दरम्यान शुक्रवारी स. ८ वा. यादी उपलब्ध झाली. आम्हाला काही दिवस ती आधी दिली असती तर प्रचार करू शकलो असतो, असे अपक्ष उमेदवार राजेंद्र ढगे यांनी सांगितले. हेतुपुरस्सर मतदारांना वंचित ठेवण्यासाठी अर्जांचे वाटप योग्य प्रकारे केले नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

## ३६० मतदारांचे मतदान

**वसईत ३७४ वयोवृद्ध व अपंग नागरिकांनी अर्ज सादर केले होते. ३७४ पैकी ३६० जणांनी शुक्रवारी गृहमतदानाचा हक्क बजावला असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अविनाश कोष्टी यांनी सांगितले आहे. इतरांचेही मतदान करवून घेतले जाणार आहे.**

लोकसत्ता पान क्र. 13

# मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम

## मतटक्का वाढविण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** सर्वाधिक मतदार असलेल्या नालासोपारा मतदारसंघात मतदान जनजागृतीसाठी स्वीप पथक नियुक्त करण्यात आले आहे. त्या अंतर्गत व्याख्याने, जनजागृती रॅली काढून मतदानाच्या दिवशी नागरिकांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडून उत्स्फूर्तपणे मतदान करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

मागील काही वर्षांपासून नालासोपारा मतदारसंघात झपाट्याने नागरीकरण झाले आहे. त्यामुळे येथील मतदारांची संख्या वाढली आहे. मागील निवडणुकीत झालेल्या मतदानापेक्षा आताच्या होणाऱ्या निवडणुकीत मतटक्का वाढला पाहिजे, यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

बुधवारी पालिकेच्या परिवहन विभागाच्या सभागृहात नालासोपारा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली मतदान जनजागृती पर बैठक पार पडली. यात महापालिका कर्मचारी, स्वीप नियुक्त कर्मचारी, अंगणवाडीसेविका, महिला बचत गट प्रतिनिधी, महिला आर्थिक विकास महामंडळातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

यात शेखर घाडगे यांनी मार्गदर्शन करीत मागील निवडणुकीत राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा कमी मतदान झालेल्या सर्व मतदान केंद्रांच्या कार्यक्षेत्रात आगामी विधानसभा निवडणूक २०२४ करिता करण्यात करणाऱ्या उपाययोजना तसेच मतदानाची टक्केवारी व मतदानाविषयी जनजागृती वाढविणेबाबत कामाचे नियोजन करावे, अशा सूचना केल्या. याशिवाय मतदारांपर्यंत १०० टक्के मतदानपत्रिका वाटप करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत.



### नालासोपाऱ्यात रॅली

मतदान जनजागृतीसाठी १३२ नालासोपारा मतदारसंघातील विरार येथे शुक्रवारी सकाळी जनजागृतीपर रॅली काढण्यात आली होती. अग्निशमन दलामार्फत बाईक रॅलीचे तर वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत रॅली काढली होती. या रॅलीद्वारे मतदानाचा हक्क बजावण्याबाबत विविध घोषणा देत व मतदान जनजागृतीचे विविध फलक घेऊन कर्मचाऱ्यांमार्फत जनजागृती करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे व नालासोपारा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे व महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

CamScanner

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पान क्र. 13

# खासदार मनोज तिवारी यांचा रोड शो

## नालासोपाऱ्यात राजन नाईक यांच्या प्रचारात नागरिकांशी संवाद



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. नालासोपारा मतदारसंघाचे उमेदवार राजन नाईक यांच्या प्रचारार्थ भाजपचे नेते खासदार मनोज तिवारी यांनी नालासोपाऱ्यात रोड शो करीत जनतेशी संवाद साधला.

नालासोपारा मतदारसंघातून महायुतीतर्फे भाजपचे राजन नाईक हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. १३२ नालासोपारा मतदारसंघ हा सर्वाधिक मतदार असलेला मतदारसंघ आहे. विशेषतः या मतदारसंघात उत्तर भारतीय मतदार अधिक प्रमाणात आहेत. त्यांची मते आपल्या पारड्यात पडावी यासाठी भाजपकडून विविध प्रकारचे प्रयोग करून मनधरणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

शुक्रवारी नालासोपाऱ्यात प्रचारासाठी भाजपचे नेते व खासदार मनोज तिवारी हे दाखल झाले होते. त्यांनी नालासोपारा पूर्वेच्या गाला नगर, प्रगतीनगर, नालासोपारा पश्चिमेच्या हनुमाननगर, यशवंत गौरव व विरार आरजे नाका या परिसरात रोड शो करीत जनतेशी संवाद साधला. लोकांनी केलेली ही फक्त गर्दी नसून माझ्या कामावर विश्वास ठेवणारा नितांत प्रेम करणारा हा अथांग जनसागर आहे. हाच जनसागर यंदा कमळ फुलवणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'टर्मिनस' उभारण्याचे सर्वपक्षीय आश्वासन!

## मिरा-भाईंदरमधील परप्रांतीय मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न

**लोकसत्ता वार्ताहर**

### मराठी मतदार नाराज

**शहरातील रेल्वे स्थानकांची अवस्था बिकट असून चाकरमानी वर्गाला दैनंदिन लोकल रेल्वेने प्रवास करणे कठीण होत आहे. अशातच यात सुधारणा करण्याऐवजी परप्रांतीय नागरिकांची हौस पुरवण्याचा प्रयत्न केला जात असल्यामुळे मराठी मतदार नाराज झाला आहे.**

**भाईंदर :** मिरा-भाईंदरमध्ये परप्रांतीय मतदारांची संख्या वाढत आहे. या मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच पक्षांच्या उमेदवारांकडून भाईंदरमध्ये रेल्वे टर्मिनस उभारण्याचे आश्वासन दिले जात आहे.

मिरा-भाईंदरमध्ये यंदा निवडणुकीच्या रिंगणात १७ उमेदवार उतरले आहेत. एकूण मतदारसंख्येत अंदाजे ४० टक्के मतदार हे उत्तर भारतीय आणि गुजराती-मारवाडी समाजाचे आहेत. त्यामुळे या मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवार वेगवेगळी आश्वासने देत आहेत. त्याचा एक भाग म्हणून भाईंदरमध्ये रेल्वे टर्मिनस उभारण्याचे आश्वासन दिले जात आहे. यात थेट राजस्थान आणि गुजरातला जाणाऱ्या एक्स्प्रेस भाईंदर स्थानकावर थांबवल्या जातील, तर बिहारला जाणाऱ्या गाड्यांची भाईंदरहून निघण्याची सोय केली जाणार असल्याची घोषणा केली जात आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

नवभारत पु. पान क्र. 3

MBVV पुलिस आयुक्तालय अंतर्गत 24 घंटे में 6 कार्रवाई

# ATM वैन से ब्लैक मनी की सप्लाई, 7.80 करोड़ रु. जब्त



■ भाईंदर, (सं). विधानसभा चुनाव के दौरान एटीएम वैन से ब्लैक मनी सप्लाई किए जाने का सनसनीखेज खुलासा हुआ है. मीरा -भाईंदर, वसई -विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत 24 घंटे में 6 कारवाई कर करीब 7 करोड़ 80 लाख रुपए नगद जब्त की है, जिसमें मीरा रोड, नया नगर, नालासोपारा, विरार, मांडवी का समावेश है. एटीएम वैन से जब्त की गई रकम का हिसाब नहीं मिलने से उस रकम को पालघर के आयकर विभाग के सुपुर्द कर दिया है, जिसकी जांच आयकर विभाग द्वारा की जा रही है. बता दें कि बीती गुरुवार की मध्यरात्रि में मीरारोड पूर्व के हाटकेश परिसर में क्राइम ब्रांच यूनिट -1 के वरिष्ठ पुलिस निरीक्षक अविराज कुराड़े की टीम ने कार्रवाई कर 27 लाख रुपए जब्त किए हैं. इससे पूर्व गुरुवार को ही दोपहर में नयानगर पुलिस थाना अंतर्गत दो एटीएम वैन से करीब 1.5 करोड़ रुपए मिले थे. नालासोपारा परिसर में 3.5 करोड़ रुपए मिले, जिसमें 40 लाख रुपए का कोई हिसाब वैन के चालकों के पास नहीं मिला था. शुक्रवार की सुबह 11 बजे के आसपास विरार पश्चिम के भाजी मार्केट परिसर से 2 करोड़ रुपए मिले, जिसकी गिनती किए जाने की जानकारी वीवीएमसी मनपा उपायुक्त रमेश मनाले ने दी.

दैनिक भास्कर पान क्र. 3

# बंद गाड़ी में मिला शव, दुर्गंध से पता चला


भास्कर संवाददाता | विरार



विरार (पश्चिम) में सड़क किनारे खड़े एक बंद टेंपो से एक युवक का शव बरामद किया गया। इस घटना से क्षेत्र में हड़कंप मच गया है। स्थानीय लोगों के मुताबिक, टेंपो कई महीने से सड़क पर खड़ा था। शुक्रवार सुबह जब टेंपो से दुर्गंध आने लगी तो मामला संज्ञान में आया। बोलिंज पुलिस दुर्घटना का मामला दर्जकर जांच में जुट गई है।

पुलिस के मुताबिक, ग्लोबल सिटी क्षेत्र में सड़क किनारे एक टेंपो खड़ा था। इस टेंपो के पास से काफी दुर्गंध आ रही थी। स्थानीय निवासियों ने इसकी सूचना बोलिंज पुलिस स्टेशन को दी। मौके पर पहुंची पुलिस ने टेंपो का दरवाजा तोड़कर अंदर सड़ा-गला शव बरामद किया। पुलिस ने शव को पोस्टमार्टम के लिए भेज दिया है। पुलिस के मुताबिक, शव के पास मोबाइल फोन, तंबाखू की डिब्बी आदि सामान बरामद हुआ है। पुलिस ने कहा कि शव की फोरेंसिक जांच रिपोर्ट के बाद ही मामला समझ में आएगा।

CamScanner
Scanned with OKEN Scanner



Cash being seized from suspicious vehicles ahead of the Maharashtra Assembly polls. PICS/HANIF PATEL

# 2,85,932 litres of illegal liquor seized in Thane alone

## Flying squads in the district have confiscated cash and goods worth ₹3.29 crore

**Continued from page 1**

THE Maharashtra Police is said to have sent all the details to income tax officials for necessary legal action, according to a senior official from the police department. "No arrest has been made so far, but we informed the I-T officials after unaccounted cash was confiscated from certain individuals," said a crime branch official from the MBVV police commissionerate.

A senior officer in Mumbai police told mid-day that they have confiscated ₹18 crore in unaccounted cash from different individuals ever since the MCC came into force.

"Cash worth crores has been found in vans carrying money to ATMs of banks in the Nalasopara and Virar police station limits. ₹3.04 crore in cash was found in a cash van at Nalasopara West. A cash totalling ₹2. 80 crore was found in a cash van within the Mandvi police station limits of Virar. Later, more cash worth ₹4 crore was found in the MBVV jurisdiction," said the official.

"As the rules regarding transporting cash prior to elections were not followed, the police seized the cash van and started an investigation," the official said. A van carrying ATM money worth ₹3.5 crore has been taken into custody by the local Crime Branch team officials. According to police officials, the ATM van had been carrying ₹3.5 crore, but they failed to produce an exact account, raising the suspicions of the police. The police are now investigating whether the money was for ATMs or was to be used for election campaigns.

Further investigation is going on in the matter and the employees in the van are being interrogated.

Yesterday, over ₹2 crore was seized from an ATM van in the Vasai-Virar City Municipal Corporation (VVCMC). "At around 11 am, a trap was laid in the vegetable market area of Virar West and the ATM van was seized," said an official, requesting anonymity. "About ₹7.80 crore in cash had been seized in Nalasopara, Mandvi and Mira Road on Thursday," said the official.

The additional commissioner of the municipality, Ramesh Manale, said the people concerned did not have any official documents mentioning the amount seized. "The case has been handed over to the income tax department for further action," said an official.

"The action was taken by the team led by Benjamin Dabare and comprising Narendra Najri and police officer Anil Sonawane," said the official.

"On Thursday also ₹3.5 crore was found in Nalasopara itself while ₹2.80 crore in Virarchamandvi and ₹1.47 crore was seized in Mira Road. Interestingly, all these unaccounted amounts were seized from banks' ATM vans," said an official.

In Thane, flying squads have seized ₹13.29 crore in cash and goods to ensure fair elections, including 2,85,932 litres of illegal liquor. Since the model code of conduct came into effect ahead of the Assembly elections, flying squads in Thane district have confiscated cash and goods worth ₹13.29 crore. This includes ₹8.82 crore in cash, along with gold and silver jewellery, and illegal liquor.

Electoral officers stated that enforcement teams—comprising district nodal officers, constituency-based officers, flying squads, and surveillance teams—have been conducting vehicle checks. Over 65 checkpoints have been set up across the district, covering areas like Thane, Navi Mumbai, Mira-Bhayandar, and rural regions. These teams, which include 62 flying squads and 111 additional teams, are inspecting suspicious vehicles at various locations throughout the city. Meanwhile, a senior police official from Palghar police said more than ₹7 crore has been seized after the MCC came into force.

**₹51.10 CR**
Value of cash and incriminating materials seized in Mumbai Suburban district

'Cash worth crores has been found in vans carrying money to ATMs of banks in the Nalasopara and Virar police station jurisdictions. ₹3.04 crore in cash was found in a cash van at Nalasopara West' An official

### Suburban haul

About ₹51.10 crore in cash and incriminating materials have been seized from October 15 from the Mumbai Suburban district till date. The seizures were made by the state police department, income tax department, state excise department, Central Goods and Service Tax (CGST), Directorate of Revenue Intelligence (DRI), Directorate of Enforcement (ED), Narcotics Control Bureau (NCB), Central Industrial Security Force (CISF), Railway Protection Force (RPF) and Customs Department.



# 21-yr-old dies while removing Diwali lantern

**Mumbai**: In a tragic incident, a 21-year-old girl, Shreya Singh, lost her life after accidentally falling from her 11th-floor apartment whilst attempting to remove a Diwali lantern on Wednesday. Bolinj police said Singh used a stool to reach the lantern from her balcony, which lacked protective grills. Family members told the police they advised her to wait before removing the decoration. She, however, lost her balance and plummeted to the ground, suffering severe head trauma. TNN

Date : 09-11-2024 08:40:26

Sign :

Scanned with OKEN Scanner

# RAIDS, SEIZURES AND PATROLS AHEAD OF POLLS



## Enforcement

15 Oct: MCC in effect

Target: Curb illegal liquor activities before polls

## Divisions involved

Mira Road, Bhayandar, Ambernath, Dombivli, Ulhasnagar, Navi-Mumbai, plus two flying squads

## OFFENCES & ARRESTS

279 Cases filed under Bombay Prohibition Act (various sections)

180 People (bootleggers and illicit brewers) arrested

## Seizures

92 Raids conducted between Oct 15 and Nov 7

## Operations & tactics

- Supervised by Excise Superintendent Pravin Tambe
- Busting illicit liquor sites (haath-bhattis) in remote jungle areas
- Use of boats for raids in dense regions

**Seized** ₹1.12cr worth of liquor

7 Vehicles confiscated

## SOPs

Checkposts with round-the-clock sub-inspector shifts

Deployment of quick response teams and special vigilance squads

Mass raids to target brewing and sale of illicit liquor

Increased night patrolling and surveillance of habitual offenders

## Dry days notice

- From 6pm on November 18 until end of voting
- Additional dry day on Nov 23 till end of vote counting

## COMPLAINT MECHANISM

Report illegal activities around you

WhatsApp number: 8422001133

Toll-free number: 1800-233-9999

Assurance of complainant anonymity

Text: Suresh Golani

THE FREE PRESS JOURNAL
Sat, 09 November 20
https://epaper.free

Scanned with OKEN Scanner

# THE BIG ELECTION SEIZURES



Mumbai police and CISF officials during a flag march at Ghatkopar ahead of the Assembly elections - Salman Ansari

**October 25**

**Location:** Near Ravi Petrol Pump, Ghatkopar

**Amount:** ₹29.5 lakh

**Investigation:** Tilak Nagar police station

**October 26**

**Location:** Bhendi Bazar

**₹1.32 crore,** five people arrested

Flying Surveillance Team (FST) of ECI/VP Road Police station

**October 30**

**Location:** Mumbai-Nashik Highway

**₹2 crore**

Kasara police station

**October 31**

**Location:** Ulhasnagar-Shahad Road

**₹17 lakh**

FST

**November 4**

**Location:** Near Dhamankar Naka, Bhiwandi

**₹2.3 crore**

FST

**Location:** Near Jain temple on S V Road, Goregaon

**₹6.11 lakh**

FST/Goregaon station

**Location:** Kalbadevi

**₹2.3 crore,** 12 people arrested

**Mumbai police**

**Location:** Goregaon (W)

**₹6,11,820**

**November 6**

**Location:** Mira Bhayandar

**₹3.5 crore**

**Location:** Mira Bhayandar Vasai Virar police Mumbai Ahmedabad highway.

**₹1.5 cr**

**November 7**

**Location:** Back Road

**₹1.49 crore**

**Location:** Naya Nagar police station, Mira Road/FST

## IN MAHARASHTRA



Cash
₹73.11cr



Liquor
₹37.98cr



Drugs
₹90.53cr



Gold, Silver
₹90.53cr

**November 8: Naya Nagar police seize ₹1.49 crore cash i[illegible]d in two incidents**



Scanned with OKEN Scanner